पुण्य नगरी

मंगळवार, २२ जुलै २०२५

# 'विवेकानंद'मध्ये बँक राष्ट्रीयीकरण दिन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये ५६ वा बँक राष्ट्रीयीकरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागातर्फे सॅटर्डे व्हील उपक्रमांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात शुभम साबळे यांनी प्रस्तावना करून केली. बँकांच्या लोगोचे अर्थ व त्यामागील संकल्पना, याबाबत रोशन खवरे यांनी अत्यंत रंजक पद्धतीने माहिती दिली. कार्यक्रमात वैष्णवी सावंत यांनी राष्ट्रीयीकृत बँकांचे घोषवाक्य मनोरंजक पद्धतीने सादर केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. कैलास पाटील यांनी बँक राष्ट्रीयीकरणाचा इतिहास, त्यामागील गरज व महत्त्व, तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी घेतलेला निर्णय आणि यातून घडलेले वित्तीय समावेशन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन खतीजा किल्लेदार यांनी केले, तर आभार यश पाटील यांनी मानले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. ए. बी. वसेकर, डॉ. संपदा ठिपकुर्ले, डॉ. संदीप पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

२ पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, २२ जुलै २०२५

# 'विवेकानंद'मध्ये बँक राष्ट्रीयीकरण दिन साजरा

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने सॅटर डे व्हील उपक्रमांतर्गत ५६ वा बँक राष्ट्रीयीकरण दिन साजरा करण्यात आला. बँकांचे विविध लोगोचे अर्थ व त्यामागील संकल्पना रोशन खवरे यांनी सांगितल्या. कार्यक्रमात वैष्णवी सावंत यांनी राष्ट्रीयीकृत बँकांचे स्लोगन्सचे, घोषवाक्य सांगितली. अध्यक्षीय भाषणात डॉ. कैलास पाटील यांनी बँक राष्ट्रीयीकरणाचा इतिहास, त्यामागील गरज व महत्त्व विशद केले. शुभम साबळे यांनी प्रास्ताविक केले. खतीजा किल्लेदार यांनी सूत्रसंचालन केले. यश पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. ए. बी. वसेकर, डॉ. संपदा टिपकुर्ले, डॉ. संदीप पाटील आदी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत ऋषीकेश कबनूकरचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बंगळूर येथील सेंट फ्रान्सिस डे सेल्स कॉलेज येथे दुसरी ट्रिपल क्राऊन चेस २०२५ स्पर्धा झाली. या स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूकर याने स्पर्धेत प्राविण्य मिळविले. त्याला रोख रक्कम, पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. ब्लीट्झ स्पर्धेमध्ये १६० गुणांची कमाई त्याने केली.

ऋषीकेश याने ब्लीट्झ स्पर्धेत गोव्यातील चॅम्पियन बुद्धिबळ खेळाडू मंदार लाड याचा पराभव केला. त्याने साडेसात गुणांची कमाई करून चौथा क्रमांक मिळविला. रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत त्याने सात गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा तो विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. विकास जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.